# महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ,

मुंबई विभागीय मंडळ,वाशी,नवी मुंबई-400703.

**M. S. Board Of Secondary And Higher Secondary Education,**

Mumbai Divisional Board, Vashi, Navi Mumbai-400 703.

परिपत्रक-क्र.मुंविम./माध्य.परीक्षा/ 3129 /वाशी, नवी मुंबई ४००७०३. दिनांक:- /०२/२०२२.

प्रति,
सर्व मान्यताप्राप्त माध्यमिक शाळा,
मुंबई /ठाणे/ रायगड/ पालघर.

**विषय :-** सन २०२२ मध्ये घेण्यात येणाऱ्या माध्यमिक व उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इ.१० वी व इ.१२ वी ) परीक्षेस प्रविष्ट होणाऱ्या आणि जिल्हास्तर, विभागस्तर तसेच राज्य, राष्ट्रीय,आतंरराष्ट्रीय पातळीवर सहभागी झालेल्या खेळाडू विद्यार्थ्यांना सवलतीचे वाढीव गुण देण्याबाबत.....

**संदर्भ :-** १) शालेय शिक्षण व क्रिडा विभाग, शासन निर्णय क्रमांक:-उमाशि-२०१५/प्र.क्र.२६२/एस.डी-२ दिनांक-२० डिसेंबर २०१८.

२) शालेय शिक्षण व क्रिडा विभाग, शासन निर्णय क्रमांक:-उमाशि-२०१५/ प्र.क्र.२६२/एस.डी-२ दिनांक-२५ जानेवारी २०१९.

३) शालेय शिक्षण व क्रिडा विभाग, शासन निर्णय क्र. संकीर्ण-२०२१/ प्र.क्र.१७/एस.डी-२, मंत्रालय, मुंबई-३२ यांचे दिनांक-२१/०२/२०२२ चे पत्र.

४)महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ यांचे जा.क्र.रा.मं./परीक्षा -७/१०२६दिनांक २२.०२.२०२२ चे पत्र.

या प्रकटनाव्दारे मुंबई विभागीय मंडळाच्या कार्यकक्षेतील सर्व मान्यताप्राप्त शाळा/ कनिष्ठ महाविद्यालय यांना सूचित करण्यात येते की, सन २०२२ मध्ये घेण्यात येणाऱ्या माध्यमिक व उच्च माध्यमिक प्रमाणपत्र परीक्षेस प्रविष्ट होणाऱ्या आणि जिल्हास्तर, विभागस्तर तसेच राज्य , राष्ट्रीय, आतंरराष्ट्रीय पातळीवर सहभागी झालेल्या खेळाडू विद्यार्थ्यांना क्रिडा सवलतीचे अनुक्रमे ०५ ते २५ गुण देण्याबाबतची कार्यपध्दतीच्या अमंलबजावणी करणेबाबत पुढील महत्वाचे मुद्दे विचारात घेण्यात यावेत.

१) सन २०२२ मध्ये घेण्यात येणाऱ्या माध्यमिक व उच्च माध्यमिक प्रमाणपत्र परीक्षेस प्रविष्ट होणाऱ्या आणि जिल्हास्तर, विभागस्तर तसेच राज्य , राष्ट्रीय, आतंरराष्ट्रीय पातळीवर सहभागी झालेल्या खेळाडू विद्यार्थ्यांना सवलतीचे वाढीव गुण देण्याबाबतची कार्यपध्दती संदर्भीय १ व ३ शासन निर्णयानुसार निश्चित करण्यात आलेली आहे. त्यानुसार खेळाडू विद्यार्थ्यांचे प्रस्ताव क्रिडा अधिकारी यांचेकडे विहित नमुन्यात सादर करावेत.

२) इ. १० वी व इ. १२ वी च्या खेळाडू विद्यार्थ्यांना देण्यात येणाऱ्या क्रीडा गुणांची सवलत ही शासन निर्णयातील परिशिष्ट १ मधील सुधारीत नियमावलीनुसार परिशिष्ट ३ ते ५ व ८ ते १० मधील आवश्यक कागदपत्रांच्या आधारे फक्त क्रीडा स्पर्धेत सहभाग घेतल्या नंतर परिशिष्ट ६ व ७ मध्ये नमूद केल्यानुसार सवलतीचे गुण अनुज्ञेय होतील.

३) खेळाडू विद्यार्थ्यांना क्रीडा सवलतीचे वाढीव गुण देण्याकरीता शासन निर्णय सोबतचे परिशिष्ट -१ मध्ये सुधारीत नियमावली देण्यात आलेली असून सदर नियमावलीच्या आधारे परिशिष्ट ६ मध्ये नमूद केल्याप्रमाणे सवलतीचे गुण देण्यात येतील. क्रीडा प्रमाणपत्रावर विद्यार्थी कोणत्या इयत्तेत खेळला त्या इयत्तेचा उल्लेख असावा.

४) इ. १० वी पूर्वी विद्यार्थ्यांने प्राविण्य मिळविलेले असले तरी, सवलतीचे गुण मिळण्याकरीता त्या विद्यार्थ्याने इ.७ वी व इ.८ वी मध्ये क्रीडा प्रकारामध्ये सहभागी होणे आवश्यक आहे तसेच सदर सहभागाचे प्रमाणपत्र प्रस्तावा सोबत जोडणे आवश्यक आहे.

५) खेळाडू विद्यार्थी कोणत्याही जिल्हयातून खेळला तरी खेळाडू विद्यार्थी ज्या ठिकाणी शिकत असेल त्या जिल्हयाचे क्रीडा अधिकारी यांनी सदर विद्यार्थ्याचा प्रस्ताव प्रमाणित करून शिफारशीसह मुदतीत मंडळ कार्यालयास सादर करावा.

६)इयत्ता १२वी करीता क्रीडा सवलतीचे गुण मिळविण्याकरीता विद्यार्थ्याचा इ. ०९ वी इ. १० वी मध्ये क्रीडा प्रकारामध्ये सहभाग विचारात घेण्यात यावा. तसेच प्रस्ताव सादर करताना प्रस्तावासोबत इयत्ता १० वी गुणपत्रिकेची छायांकित प्रत साक्षांकित करून जोडण्यात यावी.

७) खेळाडू एकापेक्षा अधिक खेळात/ क्रीडा स्पर्धेत सहभागी झालेला असेल तर त्याला उच्चत्तम असणाऱ्या एकाच सहभाग/ प्राविण्याचे सवलतीचे गुण अनुज्ञेय राहतील .

८) **संबंधित शाळा/कनिष्ठ महाविद्यालयांनी खेळाडूचे परीपूर्ण प्रस्ताव विहित नमुन्यात दिनांक ०५ एप्रिल २०२२ पर्यंत जिल्हा क्रीडा अधिकारी यांचेकडे सादर करावेत. संबंधित जिल्हा क्रीडा अधिकारी यांनी सदर प्रस्ताव दिनांक ३० एप्रिल २०२२ पर्यंत मुंबई विभागीय मंडळ कार्यालयाकडे यादी (शाळा/कनिष्ठ महाविद्यालय सांकेतांक क्रमांकसह) / शिफारशीसह सादर करावेत.**

९)खेळाडु विद्यार्थ्याने क्लब कडून , राज्य/राष्ट्रीय/आतंरराष्ट्रीय क्रीडा स्पर्धेत केलेले प्रतिनिधीत्व अथवा संपादन केलेले प्राविण्य क्रीडा गुण सवलतीसाठी अनुज्ञेय राहणार नाही.

तरी उपरोक्त प्रमाणे तसेच संबंधित शासन निर्णयाची नोंद घेवून त्याप्रमाणे उचित कार्यवाही करावी. व कोणताही विद्यार्थी सदर गुणांच्या सवलतीपासून वंचित राहणार नाही, याची दक्षता घ्यावी.

सोबत- संदर्भीय शासन निर्णयाची प्रत(पृष्ट क्रमांक १ ते

(डॉ.सुभाष बोरसे)
विभागीय सचिव,
मुंबई विभागीय मंडळ.
वाशी नवीमुंबई ४००७०३

**प्रत माहितीस्तव तथा योग्य त्या कार्यवाहीस्तव-**

१. शिक्षण उपसंचालक

२. शिक्षणाधिकारी (माध्य. ) ठाणे/रायगड/पालघर.

३. शिक्षण निरीक्षक मुंबई विभाग.

४.जिल्हा क्रीडा अधिकारी.

वरील परीपत्रकानुसार आपल्याकडे निर्धारीत मुदतीत प्राप्त झालेले शासकीय/शासनमान्य विविध संघटनाचे विद्यार्थ्यांच्या सवलतीच्या गुणांबाबतचे परीपूर्ण प्रस्ताव आपल्या यादी व स्पष्ट शिफारशीसह मंडळ कार्यालयाकडे निर्धारीत मुदतीत सादर करण्यात यावेत.

महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, पुणे ४११ ००४.

# प्र क ट न

विषय :- सन २०२१-२२ या वर्षात परीक्षा देणाऱ्या इ. १० वी व इ.१२ वी च्या विद्यार्थ्यांना क्रीडा सवलतीचे गुण देणेबाबत.

महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळामार्फत माध्यमिक शालांत प्रमाणपत्र (इ.१०वी) व उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इ.१२वी) परीक्षेचे आयोजन अनुक्रमे दि. १५/०३/२०२२ ते दि. ०४/०४/२०२२ व दि. ०४/०३/२०२२ ते दि. ०७/०४/२०२२ या कालावधीत करण्यात आलेले आहे. सदर परीक्षेसाठी कोविड-१९ या विषाणूच्या प्रादुर्भावामुळे उद्भवलेल्या असामान्य परिस्थितीमुळे शालेय शिक्षण व क्रीडा विभागाने शासन पत्र क्र.संकीर्ण-२०२१/प्र.क्र.१७/एसडी-२ दि.२१/०२/२०२२ अन्वये सन २०२१-२२ या वर्षात माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र (इ.१०वी) परीक्षेस प्रविष्ठ विद्यार्थ्यांच्या बाबतीत इ. ७ वी व इ. ८ वी मध्ये सदर विद्यार्थ्याचा क्रीडा स्पर्धेतील सहभाग विचारात घेण्यात यावा व सदर विद्यार्थ्यास सन २०२१-२२ करिता सवलतीचे क्रीडा गुण देण्यात यावेत.

तसेच सन २०२१-२२ या वर्षात उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इ.१२वी) परीक्षेस प्रविष्ठ विद्यार्थ्यांच्या बाबतीत इ. १२ वी पूर्वी इ. ९ वी व इ. १० वी मधील विद्यार्थ्याचा क्रीडा स्पर्धेतील सहभाग विचारात घेण्यात यावा व सदर विद्यार्थ्यास सन २०२१-२२ करिता सवलतीचे क्रीडा गुण देण्यात यावेत. सदर सवलत ही केवळ सन २०२१-२२ च्या परीक्षेकरिताच देय राहील असे शासनाने कळविले आहे.

तरी याबाबत सर्व मुख्याध्यापक/प्राचार्य, माध्यमिक शाळा/उच्च माध्यमिक शाळा व कनिष्ठ महाविद्यालये, शिक्षक, विद्यार्थी, पालक व इतर सर्व संबंधित घटकांनी नोंद घ्यावी.

दि. २४/०२/२०२२

(डॉ.अशोक भोसले)
सचिव
राज्य मंडळ, पुणे-०४

क्र.मुंविमं/माध्य.परीक्षा/३०२/ 3129
वाशी, नवी मुंबई-४००७०३.
दिनांक - / /२०२.

प्रति,
मुख्याध्यापक,
मुंबई विभागीय कार्यक्षेत्रातील
सर्व मान्यताप्राप्त शाळा
मुंबई/बृहन्मुंबई/ठाणे/पालघर/ रायगड जिल्हे

उपरोक्त पत्रानुसार मुख्याध्यापकांनी आपल्या स्तरावर नोंद घेवून त्याप्रमाणे उचित कार्यवाही करावी.

(डॉ. सुभाष बोरसे)
विभागीय सचिव,
मुंबई विभागीय मंडळ,
वाशी, नवी मुंबई. ४०० ७०३.

प्रतिः-

सर्व मान्यताप्राप्त माध्यमिक शाळाप्रमुख,

प्रत योग्य त्या कार्यवाहीसाठी अग्रेषितः-

१) शिक्षणाधिकारी(माध्य), ठाणे/पालघर/रायगड जिल्हा २) शिक्षण निरीक्षक, दक्षिण/उत्तर/पश्चिम विभाग, मुंबई.
३) प्रकल्प अधिकारी,एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प कार्यालय, डहाणू/शहापूर/जव्हार/पेण.
यांनी आपल्या अधिपत्याखालील माध्यमिक शाळांना परिपत्रक निदर्शनास आणावे.